MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

---

ग्राहक तक्रार क्र. १७१–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. दादासो रामू चव्हाण ,<br>मु.पो. बेळूंखी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. दादासो रामू चव्हाण, मु.पो. बेळूंखी, ता. जत, जि. सांगली यांनी अनुसूची अ मध्ये दि.४.८.२०१० ला मंचाकडे प्रतिनिधी श्री. खापरे मार्फत तक्रार दाखल केली. तक्रारदार यांनी घरात नवीन वीज पुरवठा मिळावा यासाठी अर्ज केला व चलन पावती क्र.०४७५३३८ दि. १७.४.२०१० नुसार भरले आहे.

यापूर्वी त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ३०९ दि. २३.७.२०१० रोजी दाखल केली त्याचा आदेश क्र. ८५५२ दि. २९.७.२०१० पारीत झाला त्यानुसार वि.प.स कृती मानके साध्य करण्यात अपयश आल्यास ग्राहक भरपाईबाबत निर्देशित केले आहे. या तक्रारीत मंचाकडून अपेक्षित मदत – घरगुती चलन मिळणेस झालेल्या विलंबा विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी.

वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवालात ग्राहकाला दि. १७.७.२०१० ला चलन देण्यात आले व त्यांचे लघुदाब वाहिनी ०.२४ कि.मी.चे काम आहे असे म्हटले आहे.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी दि. १८.९.२०१० रोजी सांगली येथे घेण्यात आली. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग उपस्थित. श्री. खापरे यांनी तक्रारदारास दि. १७.७.२०१० रोजी चलन दिल्याचे मान्य केले. सुनावणी दरम्यान श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता यांनी ८ आठवड्यांचा विलंब झाल्याचे मान्य केले व तक्रारदाराचा भरपाईबद्दलची तक्रार मागे घेत असल्याचा लेखी अर्ज हजर केला. त्या अर्जावर तक्रारदार प्रतिनिधी यांनी तक्रार मागे घ्यावी अशी नम्र विनंती आहे असे लिहून दिले आहे. सदरच्या अर्जामध्ये वीज कनेक्शन लवकरांत लवकर देणेचे कनिष्ठ अभियंता यांनी कबूल केलेने चलनाबद्दलची तक्रार निकाली काढणेत यावी अशी विनंती केली आहे. मंचासमोर वि.प.चे अधिकारी श्री. राजमाने यांनी ०.२४ कि.मी. लघुदाब वाहिनी व ४ पोलचे काम करुन– ५ ऑक्टोबर २०१० पर्यंत तक्रारदारास कनेक्शन देण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदार यांनी विलंबापोटी भरपाईची मागणी मागे घेतली आहे, त्यामुळे तक्रार निकाली काढणेत येत आहे. मंजूर करण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष